आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

९ डिसेंबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- विविध मुद्द्यांवरून विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब

- भारतीय तरुणांच्या कौशल्य विकासावर शासन भर देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- भारतीय नौदलाच्या तुशील या युद्धनौकेचं जलावतरण, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते आज होणार

- महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड

**आणि**

- आशिया चषक ज्युनियर हॉकी स्पर्धेत भारतीय महिला संघाचा बांग्लादेशावर दणदणीत विजय

**<><><><>**

संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज आज विविध कारणांवरून आधी दुपारी बारा वाजेपर्यंत आणि त्यानंतर दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब झालं.

लोकसभेत आज विरोधी पक्षांनी अदानी उद्योगसमूहावरच्या तथाकथित लाचखोरीच्या आरोपांवरून गदारोळ केल्यानं सभागृहाचं कामकाज दुपारी बारा वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. सकाळी कामकाजाला सुरुवात होताच विरोधकांनी या प्रकरणी निषेधाच्या घोषणा दिल्या. प्रश्नोत्तराच्या तासात इतर मुद्दे उपस्थित करता येणार नाहीत, असं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी सांगितल्यावर गदारोळ वाढला, त्यानंतर सभापतींनी कामकाज बारा वाजेपर्यंत आणि त्यानंतर दोन वाजेपर्यंत तहकूब केलं.

त्यापूर्वी संसद भवन परिसरातही विरोधकांनी या मुद्‍द्यावरून निदर्शनं केली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, डीएमकेचे टी. आर. बालू, आरजेडी चे  मनोज झा इत्यादी नेते यात सहभागी झाले होते.

राज्यसभेत सत्ताधारी तसंच विरोधी पक्षांनी विविध कारणांवरून दिलेल्या तहकुबीच्या नोटीस अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळून लावल्या. सभागृहाचं कामकाज नीटपणे चालू देण्याचा आग्रह त्यांनी धरला. मात्र गदारोळ चालूच राहिल्यानं राज्यसभेचं कामकाजही बारा वाजेपर्यंत आणि त्यानंतर दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><>**

भारतात येणाऱ्या काळात तरुणांची संख्या सर्वात जास्त असणार असून या तरूणांच्या कौशल्यविकासावर शासन भर देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. राजस्थानमध्ये जयपूर इथं होत असलेल्या रायझिंग

राजस्थान या वैश्विक गुंतवणूक परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते संबोधित करत होते. सध्या भारत तंत्रज्ञान आणि इंटरनेटच्या साहाय्यानं लोकशाही, लोकसंख्याशास्त्र आणि डेटा पॉवर या क्षेत्रांमध्ये अव्वल स्थानावर पोहोचला आहे. तसंच गेल्या दहा वर्षात भारत जगातली पाचवी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनली असून भारताच्या एफडीआय आणि निर्यात क्षेत्रामध्ये दुपटीनं वाढ झाली आहे. राज्यांचा विकास हा महत्वाचा असून राजस्थान हे उद्योग क्षेत्रातलं विश्वासार्ह राज्य असल्याचं त्यांनी यावेळी म्हटलं आहे.

तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत ३२ राष्ट्रांच्या प्रतिनिधींसह, पाच हजारांहून अधिक व्यावसायिक, व्यापार प्रतिनिधी, राजदूत आणि गुंतवणूकदार सहभागी झाले आहेत. सतरा देश या परिषदेचे भागीदार आहेत. राज्यात गुंतवणुकीला चालना मिळावी म्हणून राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी ऊर्जा, एमएसएमई, पर्यटन तसंच खाणकाम यासंदर्भात नवीन ९ धोरणं लागू केली असून, या शिखर परिषदेला प्रारंभ होण्यापूर्वी गुंतवणुकीशी निगडीत तीस लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करारही करण्यात आले आहेत.

**<><><><>**

रशियाच्या कॅलिनीनग्राड इथल्या यंत्रा बंदरात भारतीय नौदलाच्या बहुपयोगी, क्षेपणास्त्र सज्ज, अत्याधुनिक आयएनएस तुशील या युद्धनौकेचं जलावतरण संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या हस्ते आज होणार आहे. यावेळी नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी देखील उपस्थित असतील. संरक्षण मंत्री सिंग यांचं काल रात्री तीन दिवसांच्या रशियाच्या दौऱ्यावर आगमन झालं आहे. ते आज होणाऱ्या उभय देशांच्या लष्करी आणि लष्करी

तंत्रज्ञानविषयक सहकार्यावरच्या आंतर-सरकारी आयोगाच्या २१व्या बैठकीचं रशियाचे संरक्षण मंत्री आंद्रे बेलोसोव्ह यांच्यासोबत सहअध्यक्षपद भूषवतील. औद्योगिक सहकार्यासह दोन्ही नेते उभय देशांच्या लष्करी, संरक्षण क्षेत्रातल्या बहुआयामी संबंधांचा आढावा घेतील. तसंच परस्पर हिताच्या समकालीन प्रादेशिक तसंच जागतिक मुद्द्यांवर वैचारिक देवाणघेवाण करतील. संरक्षण मंत्री यावेळी मॉस्कोमध्ये दुसऱ्या महायुद्धात वीरमरण प्राप्त झालेल्या सोव्हिएत सैनिकांना द टॉम्ब ऑफ द अननोन या समाधीस्थळी श्रद्धांजली वाहतील. तसंच स्थानिक भारतीय समुदायाशीही संवाद साधतील.

**<><><><>**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी काल नॉर्वे आणि भारत यांच्यादरम्यान स्टार्टअप पूल सुरू करण्याचा प्रस्ताव दिला. उभय देशांच्या व्यापार संबंधांना वृद्धिंगत करण्यासाठी वचनबद्ध असल्याचं गोयल यांनी सांगितलं. भारतीय उद्योग महासंघ, अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग यांच्या सहकार्यानं मुंबईत आयोजित भारत-नॉर्वे व्यावसायिक चर्चेला संबोधित करताना गोयल बोलत होते. नुकताच भारत आणि युरोपियन मुक्त व्यापार संघटना  यांच्यात नुकताच व्यापार आणि आर्थिक भागीदारी करार करण्यात आला. त्यात युरोपियन महासंघातल्या स्वित्झर्लंड, आयर्लंड, नॉर्वे आणि लिंकटेस्टीन या विकसित राष्ट्रांचाही समावेश आहे.

**<><><><>**

दिल्लीच्या शंभू सीमेवर सुरु असलेल्या शेतकरी आंदोलनासंबंधी नवी याचिका दाखल करून घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. यासंबंधात न्यायालयात आधीच याचिका प्रलंबित असल्याने त्याच मुद्द्यावर नवी याचिका न्यायालय स्वीकारणार नाही असं न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील पीठाने आज नमूद केलं आहे.

आंदोलनासाठी महामार्गांवर अडथळे आणणे हा राष्ट्रीय महामार्ग कायद्यानुसार गुन्हा आहे आणि म्हणून न्यायालयाने आंदोलनकर्त्यांना हटवण्याचे आदेश द्यावेत यासाठी ही याचिका दाखल करण्यात आली होती.

**<><><><>**

महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांची आज बिनविरोध निवड झाली. हंगामी अध्यक्ष कालीदास कोळंबकर यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी अध्यक्षपदासाठी नार्वेकर यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला होता, त्यांच्याविरोधात अन्य कोणीही उमेदवार नसल्याने हा प्रस्ताव सभागृहाने एकमताने मंजूर केला.

त्यानंतर मुख्यमंत्री आणि दोन्ही मुख्यमंत्र्यांनी तसंच जयंत पाटील आणि नाना पटोले यांनी अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचं अभिनंदन केलं. नार्वेकर यांची ओळख विद्वान आणि संयमी अशी असून राज्याच्या इतिहासात सलग दोनदा पद भुषवणारे ते चौथे व्यक्ती आहेत, असं देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या भाषणात सांगितलं. आधीच्या कार्यकाळात अध्यक्षांनी ज्याप्रकारे

निःपक्षपातीपणे कामकाज चालवलं तीच परंपरा पुढे सुरू राहील असंही फडणवीस म्हणाले.

त्याआधी सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यावर हंगामी अध्यक्ष कालीदास कोळंबकर यांनी जयंत पाटील, विनय कोरे, सुनील शेळके आणि उत्तम जानकर यांना विधानसभा सदस्यत्वाची शपथ दिलं. तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचा परिचय करून दिला.

**<><><><>**

झारखंड विधानसभेचं विशेष अधिवेशन आजपासून सुरु झालं आहे. विधानसभेचे तात्पुरते अध्यक्ष स्टीफन मरांडी यांनी सदस्यांना शपथ द्यायला सुरुवात केली आहे. शपथग्रहण संपल्यावर उद्या विधानसभा अध्यक्षांची निवडणूक होईल,त्यानंतर हेमंत सोरेन सरकारच्या विश्वासदर्शक ठरावावर मतदान घेतलं जाईल, बुधवारी राज्यपालांच अभिभाषण होईल आणि त्यानंतर राज्याचा पुरवणी अर्थसंकल्प सादर केला जाईल.

**<><><><>**

ओमानमध्ये मस्कत इथं सुरू असलेल्या महिलांच्या कनिष्ठ गट आशिया चषक हॉकी स्पर्धेत काल भारतीय संघानं बांग्लादेशावर १३-१ असा दणदणीत विजय मिळवला. भारतातर्फे मुमताज खान हिनं ४ तर कनिका सिवाच आणि दीपिका यांनी प्रत्येकी ३ गोल केले. आज गट साखळीतला भारताचा दुसरा सामना मलेशियासोबत होणार आहे. ही स्पर्धा पुढच्या वर्षी

चिली इथं होणाऱ्या कनिष्ठ गटाच्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठीची पात्रता फेरी आहे.

**<><><><>**

हाँग काँगमध्ये होत असलेल्या जागतिक स्क्वॉश संघ अजिंक्यपद स्पर्धेत सुरुवातीच्या क गटात भारतीय महिला गटानं कोलंबियाचा २-१ असा पराभव केला. आज भारतीय महिला संघाची गाठ बेल्जियम संघासोबत पडणार आहे. भारतीय पुरुष संघ या स्पर्धेतला सलामीचा सामना आज खेळणार असून त्यांची लढत कोलंबिया संघाबरोबर होईल.

**<><><><>**

फिडे जागतिक बुद्धीबळ स्पर्धेत भारताच्या डी गुकेशचा सामना चीनच्या गतविजेच्या डिंग लिरेन याच्याशी होणार आहे. दुपारी अडीच वाजता सिंगापूर इथं हा सामना होणार आहे. गुकेशने कालच्या सामन्यात विजय मिळवून स्पर्धेत ६-५ अशी आघाडी घेतली आहे.

**<><><><>**

भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ आज बांगलादेशाची राजधानी ढाका इथं पोहोचलं. दोन्ही देशातल्या परराष्ट्र धोरणासंबंधी चर्चा यावेळी होणार आहे. बांगलादेशात नवीन हंगामी सरकार स्थापन झाल्यानंतरची दोन्ही देशातली ही पहिलीच बैठक आहे. बांगलादेशाच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या महासंचालक इशरत जहाँ यांनी मिस्त्री यांचं ढाक्यात स्वागत केलं.

**<><><><>**

सीरियामध्ये परिस्थिती गंभीर झाली असली तरीही राजधानी दमास्कसमधल्या भारतीय दुतावासाचे कामकाज सुरू राहणार आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दुतावास स्थानिक भारतीयांच्या संपर्कात असून ते सर्व सुरक्षित आहेत. भारतीयांच्या मदतीसाठी दुतावास उपलब्ध असेल असंही सांगितलं आहे.

**//<><><><>//**